# १) चित्रपटगृह परवाना मिळणेकरीता सादर करावायाचा अर्जाचा नमुना

दिनांक-

प्रति,

मा.पोलीस आयुक्त,
ठाणे शहर

विषय - चित्रपटगह परवाना मंजुरीकरीता नाहरकत दाखला मिळणेबाबत...

अर्जदार -

महोदय,

वरील विषयान्वये सादर करतो की, मी ............................................ (अर्जदारांचे नाव व पत्ता) सर्व्हे क्र............ प्लॉट नं............ ता............जि............ येथील ठिकाणी प्रस्तावित इमारतीचे बांधकामाकरीता ठाणे/कल्याण/उल्हासनगर महानगरपालिका बांधकाम विभागाकडून क्रमांक...........दिनांक.........अन्वये बांधकामाची परवानगी व विकास प्रस्ताव..............च्या अंतर्गत परवानगी प्राप्त आहे. सदर विकास प्रस्ताव नियमानुसार मल्टीप्लेक्स/थिएटर करीता मा.पोलीस आयुक्त ठाणे यांचेकडील नाहरकत दाखला बांधकाम सुरु करणेपुर्वी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तरी मला मल्टीप्लेक्स/थिएटर इमारतीचे बांधकाम विकासाकरीता आपलेकडून नाहरकत दाखला मिळण्यास विनंती आहे. सोबत आवश्यक कागदपत्रे जोडून सादर करीत आहे.

आपला विश्वासू,

## २) चित्रपटगृह परवाना मिळणेकरीता अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी

### महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम ६ चित्रपटगृह स्थाननिश्चिती

१. चित्रपटगृह स्थाननिश्चिती बाबतचे नाहरकत प्रमाणपत्र देण्याची पुर्वमंजुरी शासनाकडुन देण्यात येते. अर्जदार यांनी सदर परवानगीसाठी आवश्यक सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रांसहीत अर्ज या कार्यालयात सादर केल्यानंतर ६० दिवसांत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.

२. अर्जदार महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम ३ अन्वये नमुना अ मध्ये नमुद आशय हा किमान १.२०मीटरX०.९०मीटर इतक्या आकाराच्या फलकावर मराठी भाषेत चित्रपटगृहाची जागा ज्या रहदारीच्या मार्गावर लागुन असेल त्या मार्गावरून स्पष्टपणे दिसू शकेल अशाप्रकारे प्रस्तावित जागेवर एका फलकावर सुचना लावून चित्रपटगृह उभारण्याचा उद्देश जाहीर करेल.

३. अर्जदार महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम),नियम १९६६ मधील नियम ४ अन्वये आक्षेप मागविण्यासंबंधी नमुना ब मध्ये नमुद आशय हा कोणत्याही दोन स्थानिक नामांकित वृत्तपत्रातून प्रसिद्ध करेल.

४. महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम ५ अन्वयेची माहिती प्रस्तावासोबत सादर करणे.

५. स्थान निश्चितीसाठी नाहरकत दाखला देण्यासंबंधी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे -

   a) जागामालक आणि कंपनी यांचेमध्ये झालेला डेव्हलपमेंट करार.
   b) रजीस्टार ऑफ कंपनीचे प्रमाणपत्र
   c) महानगरपालिका यांचे बांधकाम परवानगीचे प्रमाणपत्र
   d) अग्निशमन विभाग यांचे नाहरकत प्रमाणपत्र
   e) संचालक, नगररचनाकार, महानगरपालिका यांचे मान्यताप्राप्त प्लॅन
   f) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील बांधकामासाठी परवानगी मिळणेकामीचे नाहरकत प्रमाणपत्र
   g) जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचा चित्रपटगृहासाठी जागा निश्चित करण्यास हरकत नसलेबाबतचा अहवाल
   h) वास्तुविशारद यांचा सराऊंडींग प्लॅन
   i) ॲडव्होकेट यांचा रिपोर्ट ऑन टायटल
   j) वाहतुक व पार्किंगबाबत पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांचा अहवाल

६. सदर प्रस्तावास शासनाकडुन महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम ६ नुसार स्थाननिश्चिती करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत पुर्वमंजुरी दिल्यानंतर, पोलीस आयुक्त कार्यालयाकडुन अर्जदार यांना नियम ९१ नुसार बांधकामाची परवानगी व नमुना ड मध्ये नाहरकत प्रमाणपत्र दिले जाते.

**महाराष्ट्र चित्रपटग़ृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम १०१ चित्रपटगृह परवाना**

१. चित्रपटगृह परवाना मंजुरीचे नाहरकत प्रमाणपत्र शासनाकडुन देण्यात येते. चित्रपटगृहाची इमारत बांधुन तयार झाल्यानंतर अर्जदार यांनी सदर परवान्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रांहीत अर्ज या कार्यालयात सादर केल्यानंतर ६० दिवसांत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.

२. चित्रपटग़ृह परवाना मंजुरीसाठी शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे-

a) अर्जदार यांनी सदर चित्रपटगृहात असलेल्या हित संबंधात मालकी हक्काची कागदपत्रे, जागा मालकाची संमती, भागीदाराचे मुखत्यारपत्र इ.

b) नियम ११६ प्रमाणे अर्जदारांनी नामनिर्देशीत केलेल्या व्यवस्थापकांची नावे, विज संच मांडणी प्रभारी असणाऱ्या विजतंत्रींची नावे व पत्ते आणि अर्हता प्राप्त चलचित्रकार चालक यांची माहिती

c) महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम ६ प्रमाणे देण्यात आलेल्या शासनाच्या नाहरकत प्रमाणपत्रांची प्रत

d) महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम ९१ नुसार आवश्यक असलेली बांधकाम परवानगी प्रत

e) मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल कन्सल्टन्टस् यांचे स्टॅबिलीटी सर्टिफिकेट

f) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी चित्रपटगृहाचे नकाशाचे अनुषंगाने महाराष्ट्र चित्रपटगृहे सिनेमा नियम १९६६ मधील सुधारणा २२ जुलै २००४ अन्वये तपासणी करुन दिलेले अंतिम योग्यता प्रमाणपत्र

g) अग्निशामक अधिकारी महानगरपालिका यांचेकडील अंतिम नाहरकत पत्र

h) आगप्रतिबंध उपाययोजना केल्याबाबत संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवासंचालनालय यांचे प्रमाणपत्र

i) विदयुत निरीक्षक, विदयुत निरीक्षण विभाग ठाणे यांचे महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन), नियम १९६६ मधील नियम १००(४) मधील अटींची पुर्तता केल्याबाबत व चित्रपटगृहात नियम क्र. ७२,७७,७८(३) नुसार विजसंचाची मांडणी योग्य प्रकारे असल्याबाबत तसेच विज सयंत्र व चित्रदर्शक उपकरणे अर्हता प्राप्त व्यक्तीच्या ताब्यात आहेत अशा अर्थाचे प्रमाणपत्र.

j) संबंधीत उप आरोग्य प्रमुख (परवाना) महानगरपालिका यांचे चित्रपटगृहाला आरोग्यदृष्टया परवाना देण्यास हरकत नसलेबाबत नाहरकत पत्र

k) चित्रपटगृहातील दुरध्वनी चालु स्थितीत असलेबाबतचे प्रमाणपत्र

l) लायसन्सधारक विदयुत कंत्राटदार यांनी चित्रपटगृहाचे इमारतीमध्ये तडीतवाहकाची योग्य ती तरतुद केली असलेबाबतचे प्रमाणपत्र

m) संबंधीत सहाय्यक अभियंता बांधकाम नियंत्रण, महानगरपालिका यांनी चित्रपटगृहासाठी दिलेले अंतिम भोगवटापत्र

n) फिल्म डिव्हीजनकडील प्रमाणपत्र

o) महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन), नियम १९६६ मधील नियम ९० नुसार अंतिमरित्या मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी साक्षांकित करुन सादर केलेले मुळ नकाशे

p) उंचीबाबत निर्गममार्ग तसेच कोणतेही आसनमार्गिके पासुन १० आसनांपेक्षा अधिक दुर असणार इ. बाबत सक्षम प्राधिकारी यांचे अभिप्राय (आर्किटेक्ट)

q) पहिल्या रांगेत बसलेल्या व्यक्तीच्या डोळयाच्या पातळीला समांतर अशा रेषेने चित्राच्या वरच्या उंचीपर्यंत केलेला कोन हा ५० अंशापेक्षा जास्त नसावा.

३. सदर प्रस्तावास शासनाकडुन महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन), नियम १९६६ मधील नियम १०१ नुसार चित्रपटगृह परवाना देण्यास नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर व अर्जदाराने शासकीय शुल्क भरल्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालयाकडुन अर्जदार यांना प्रत्येक स्क्रिनकरीता स्वतंत्र **1)**Licence for Cinema (Form E) and **2.** Licence to sell or keep for sale, or offer or Expose for sale any tickets of admission, Pass or other evidence of the right of right of admission to a cinema (Form F)
मध्ये परवाना देण्यात येतो. नियम १०४ नुसार सदर परवाना तीन वर्षापेक्षा अधिक नाही अशा कोणत्याही मुदतीसाठी अर्जदाराची तशी इच्छा असल्यास देता येतो.

## महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियम), नियम १९६६ मधील नियम १०५ परवाना नुतनीकरण करणे

१. अर्जदार यांनी नुतनीकरणासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे व नाहरकत प्रमाणपत्रांसहीत अर्ज या कार्यालयात सादर केल्यानंतर, सदर अर्जाबाबत संबंधीत पोलीस ठाणे, विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचेकडुन चौकशी अहवाल प्राप्त झालेनंतर ३० दिवसांत परवाना नुतनीकरण करण्यात येईल.

२. गृहविभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.बीसीआर-०१२००३/२९९/विशा.५, दि.२४/०९/२००३ नुसार परवानाधारक यांनी परवाना प्राधिकाऱ्याला प्रत्येक वर्षीच्या डिसेंबर महिन्यात अर्ज करणे आवश्यक राहील.

३. परवानाधारक यांना परवाना नुतनीकरणासाठी ज्या वर्षासाठी नुतनीकरण करावयाचे आहे, त्या वर्षासाठी वैध असलेली खालील नमुद नाहरकत प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

   a) अग्निशमन विभाग यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र किंवा डायरेक्टर ऑफ महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस यांचेकडुन परवाना प्राप्त अग्निसुरक्षेबाबत तपासणी करणारी खाजगी एजन्सी यांचेकडील फॉर्म-बी प्रमाणपत्र
   b) विदयुत निरीक्षक, विदयुत विभागाकडील नाहरकत प्रमाणपत्र
   c) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ चे नाहरकत प्रमाणपत्र
   d) कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, यांचे साऊंड प्रुफ आणि फिटनेसबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र
   e) आरोग्य विभाग यांचे नाहरकत प्रमाणपत्र
   f) अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अंतर्गत परवाना

# ३) चित्रपटगृह परवाना अर्जासाठी भरावयाची फी

**गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी क्र. संकिर्ण-०३१७/प्र.क्र.५६/विशा दि.०८/०३/२०१८ अन्वये चित्रपटगृह परवाना व नुतनीकरणासाठी खालीलप्रमाणे शासकीय फी निश्चित केली आहे.**

| अ.क्र. | परवान्याचा प्रकार | वर्ष | आसन संख्या | फी |
|---|---|---|---|---|
| १. | चित्रपटगृह परवाना (Form E) | १ वर्षाकरीता | २०० आसन संख्ये पर्यंत | रु. ५०००/- |
| | | | २०१ ते ५०० आसन संख्ये पर्यंत | रु. १०,०००/- |
| | | | ५०१ व त्याहुन अधिक आसन संख्येकरीता | रु. १५,०००/- |
| | | २ वर्षाकरीता | २०० आसन संख्ये पर्यंत | रु. ८०००/- |
| | | | २०१ ते ५०० आसन संख्ये पर्यंत | रु. १३,०००/- |
| | | | ५०१ व त्याहुन अधिक आसन संख्येकरीता | रु. १८,०००/- |
| | | ३ वर्षाकरीता | २०० आसन संख्ये पर्यंत | रु. १३,०००/- |
| | | | २०१ ते ५०० आसन संख्ये पर्यंत | रु. २४,०००/- |
| | | | ५०१ व त्याहुन अधिक आसन संख्येकरीता | रु. ३७,०००/- |
| २. | तिकीट विक्री परवाना (Form F) | प्रतिवर्ष | ------- | रु. ५००/- |
| ३. | दुय्यम परवाना | ------- | ------- | रु. ५००/- |
| **टिप- नुतनीकरण फी मध्ये दरवर्षी १० टक्के वाढ** | | | | |

**फी भरण्याची पद्धत-** शासकीय फी शासनाकडील (GRAS Govt. Receipt Accounting System) या प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने चलनाद्वारे भरण्यात येते.

## ४) चित्रपटगृह परवाना मिळणेकरीता अर्जदार यांना देण्याचा परवाना नमुना

**SHEDULE "A"**
For leviable for this vide rule ६.
**LICENCE FOR PREMISES.**
**( RULE १०)**

**LICENCE No. TC/LB/४/Multiplex/ /( )/**

Under the powers vested in the Commissioner of Police, by section ३३ (१) (V) of the Mumbai Police Act, १९५१ (Bom. of XXII of १९५१) and subject to the conditions and restrictions laid down in the rules for places of public amusement in the Thane district, made with the previous sanction of the Government of Maharashtra by the District Magistrate, Thane, licence is hereby granted to --------------------------Regd. Office--------------------------India authorizing to keep a premises known as-------------------------, situated at ---------------------------------- to be opened between ६ a.m. and ०.१५ a.m. from this date until th day of subject nevertheless to suspension or revocation under afore said rule,

**Multiplex/Theatre Name and Address**

**situated at**

| Number and name of the Different divisions of the auditorium. | Number of person that said such division can accommodate | No. and position Of entrance and exit in each division |
|---|---|---|
| **१ Class** | **Seats** | **Seats** |
| Normal<br>Executive<br>Premier | | Entry १ (one)<br>Exit २ (Two) |

**Given under my hand and seal, this th day of**

As Approved & Order by
Commissioner of Police, Thane

(Sd/-)
For Commissioner of Police, Thane.

**Fees ५००/-**

**FORM - F**

**LICENCE No. TC/LB/४/Multiplex/ /( )/** **Date-**

License to Sell or keep For Sale, or Offer or Expose For Sale Any Ticket of Admission, pass or other Evidence of The Right of Admission to a cinema.

Under rule १०८ of the Maharashtra Cinemas (Regulation) Rules, १९६६, license is hereby granted to.......................................... .................................... Regd. Office ..............................................................India to sale or keep for sale or offer or expose for sale of ticket of admission pass or other evidence of the right of admission to the permanent /quasi permanent/touring cinema known as

**Multiplex/Theatre Name and Address**
**"Screen "I"**

The licensee shall sell, offer keep or expose for sale any ticket of the admission pass or other evidence of the right of admission to the above cinema at the following places:

**Cinepolis Multiplex, Screen - I,**
**situated at**
**२nd Floor, Viviana (Viva) City Mall, S. No. ४८/१ to ३५/४(PT),**
**S.No. ४९/१ to S.No. ८२, ८५/१ (PT) , Hissa No. १ & S. No. २८६,**
**Eastern Express Highway, Majiwada, Thane (west)**

This licence is valid till the **st day of , .**

This licence is granted or renewed subject to the provisions of the Maharashtra Cinemas (Regulation) Rules १९६६ and is liable to be suspended or cancelled for breach of any of the provisions of the said Rules, and any breach of the provision of the said Rules is punishable under the provisions of section ७ of the Act.

Given under my hand and seal, this th day of

As Approved & Order by
Commissioner of Police, Thane

(Sd/-)
For Commissioner of Police, Thane.

## Renewal

| Date of renewal | Date upto which valid | Fee paid | Signature of Licensing authority |
|---|---|---|---|
| | | | |